# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय, लातूर

| | | |
|---|---|---|
| Office : 02382-250634<br>Fax :- 02382-251866<br>E-mail:- celatur@mahadiscom.in | महावितरण | Office of the Exe. Engr. CGRF<br>Latur Zone, Vidyut Bhavan, Ground floor, Old power house, Sale galli, Latur – 413512 |
| **EE/CGRF/LTR/104** | | **Date :- 08.07.2019** |

**ग्राहक तक्रार क्र.** : १५/२०१९

**तक्रार दाखल दिनांक** : ०४.०६.२०१९

**प्रति,**

१. **मे. इंडस टॉवर्स लि.**
   २०१०, ई-कोर, दुसरा मजला,
   मार्वल एज, विमान नगर, पूणे - ४११०१४.

२. **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
   अति-कार्यकारी अभियंता, म. रा. वि. वि. कं.मर्या. दक्षिण उपविभाग, लातूर

**विषय :-** तक्रार अर्ज क्र. १५/२०१९ प्रकरणी निकाल

वरील विषयास अनुसरुन मे. इंडस टॉवर्स लि, यांच्या तक्रार अर्जाप्रमाणे सुनावणी घेवून तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे. सदरील प्रकरणी निकालाची छायांकीत प्रत सोबत आपल्या माहितीस्तव जोडलेली आहे.

8/7/19

**कार्यकारी अभियंता**
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत
ग्राहक तक्रार निवारण मंच, लातूर

**सोबत :** वरीलप्रमाणे

**प्रतिलिपी सविनय सादर :-**

**१)** मुख्य अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, परिमंडल कार्यालय, लातूर

**प्रतिलिपी :-**

१) अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, लातूर
२) कार्यकारी अभियंता (प्र) म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, लातूर
३) कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित विभागीय कार्यालय, लातूर

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय लातूर

**ग्राहक तक्रार क्रमांक : १५/२०१९ (दिनांक : ०४.०६.२०१९)**

**मे. इंडस टॉवर्स लि.**
**२०१०, ई-कोर, दुसरा मजला,**
**मार्वल एज, विमान नगर, पूणे - ४११०१४.** **--ग्राहक अर्जदार**

**-- विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**अति-कार्यकारी अभियंता, म. रा. वि. वि. कं.मर्या.**
**दक्षिण उपविभाग, लातूर** **-- गैरअर्जदार**

| | | | |
|---|---|---|---|
| **कोरम :** | **श्री. पंडितराव बी. मोरे** | **:** | **अध्यक्ष** |
| | **श्री. सुधीर भाऊराव देशमुख** | **:** | **सदस्य** |
| | **श्री. गौतम ना. गायकवाड** | **:** | **सचिव** |

## निकाल
**दि. ०८.०७.२०१९**

ग्राहक अर्जदार, (ग्राहक क्र. ६१०५५१३९२२२१) "मे. इंडस टॉवर्स लि. " २०१०, ई-कोर, दुसरा मजला, मार्वल एज, विमान नगर, पूणे. यांनी त्यांची तक्रार 'अ' फॉर्ममध्ये दि. ०४.०६.२०१९ रोजी मंचामध्ये दाखल केली आहे. त्यानुसार ग्राहकाचे असे म्हणणे आहे की, त्यांनी विद्युत पूरवठा घेण्याचे बंद केले आहे या कारणास्तव त्यांची अनामत ठेव रक्कम रु. ८२३७/- त्यांना परत देण्यात यावी.

२) गैर अर्जदार महावितरण तर्फे श्री. रामढवे महेश, सहा. लेखापाल, दक्षिण उपविभाग, लातूर यांनी त्यांची बाजु अशी मांडली की, विज ग्राहक मे. इंडस टॉवर्स लि. पूणे चे सुरक्षा ठेव परत मिळणे बाबत केलेला अर्ज हा दक्षिण उपविभागास अद्याप पर्यंत म्हणजेच आज दि. ०३.०७.२०१९ पर्यंत प्राप्त झालेला नाही. याबाबत त्यांनी स्वत: दि. १२.०६.२०१९ रोजीचे मा. ग्राहक तक्रार निवारण मंच यांचे पत्र क्र. ७७ नुसार मे. इंडस टॉवर्स यांना सदर पत्र दि. १९.०६.२०१९ रोजी प्राप्त होतास संपर्क साधला व सदर त्याची परत पोच पावती ची प्रत मेलवर पाठविणे बाबत विनंती केली. त्यावरुन दि. २०.०६.२०१९ रोजी त्यांनी सदर अर्जाच्या परत पोच पावती ची प्रत sdo4640@gmail वर पाठविले सदर मेलवर पाठविलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता सदर अर्ज हा दक्षिण उपविभाग, लातूर ऐवजी उत्तर उपविभाग कार्यालय येथे दि. २६.०४.२०१८ दक्षिण उपविभागास सादर करणेबाबत उत्तर उपविभाग यांना सांगितले असून सदर अर्ज उत्तर उपविभाकडून दक्षिण उपविभागास प्राप्त झाल्यास तात्काळ कार्यवाही करुन सुरक्षा ठेव रक्कम

रु. ८२३७/- परत मिळणे बाबतचा प्रस्ताव दक्षिण उपविभागामार्फत विभागीय कार्यालय, लातूर येथे अग्रेषित करण्यात येईल.

३) इंडस टॉवर्स लि. यांचा सुरक्षा ठेव ग्राहकास परत मिळणे बाबतचा प्रस्ताव दक्षिण उपविभागीय कार्यालयाचे पत्र क्र. जा.क्र/अ.का.अ/लातूर/शहर (द) लेखा ०९८२ दि. ०६.०७.२०१९ अन्वये मा. कार्यकारी अभियंता स.व.सु विभाग, लातूर यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे. सोबत विज ग्राहकाने दिलेली सर्व आवश्यक कागदपत्रे तसेच रु. १००/- च्या मुद्राकांवर Execution of Indemnity Bond सादर केलेला आहे. तसेच सदर पत्राची प्रत आज दि. ०८.०७.२०१९ रोजी मा. ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे सादर केलेली आहेत. वरील कारणाचा विचार करता असे स्पष्ट होते की, ग्राहकास अनामत ठेवीची रक्कम त्वरीत मिळावयास हवी होती. तथापी ग्राहकाकडून अनामत ठेव परत घेण्याबाबतची कार्यवाही योग्यरित्या करण्यात आलेली नसल्याचे दिसुन आले. वास्तवीक पाहता ग्राहकाने सदरचा अर्ज दक्षिण उपविभाग लातूर यांच्याकडे करणे आवश्यक होते. या उलट सदर चा अर्ज अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दिला. विद्युत महामंडळाची कोणतीही चुक दिसुन येत नाही. या उपरोक्ष ग्राहकास अनामत ठेव परत देणे क्रमप्राप्त आहे. सबब आदेश.

## आदेश

१) ग्राहक अर्जदाराची 'अ' फॉर्म मधील तक्रार मान्य करण्यात येत आहे.

२) दक्षिण उपविभाग लातूर यांनी ग्राहकाची अनामत रक्कम रु. ८२३७/- (आठ दोन तीन सात) आदेश मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत परत करावी.

३) ग्राहकाने बॅंकेचा खाते उतारा द्यावा.

४) ग्राहक अर्जदारास मंचाचा निर्णय मान्य नसेल तर ग्राहक अर्जदार मंचाच्या निकालापासून ६० दिवसाच्या आत ब फॉर्म मध्ये आपले आवेदन खालील पत्त्यावर मा. विद्युत लोकपाल यांचे कडे सादर करु शकतात. फॉर्म ब या कार्यालयात कार्यालयीन वेळेत विनामूल्य मिळेल. मा. विद्युत लोकपाल यांचा पत्ता खालील प्रमाणे आहे.

मा.विद्युत लोकपाल
महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग,
प्लॉट नं.१२ श्रीकष्ण विजय नगर छावणी,
नागपूर-४४००१३.
दुरध्वनी क्र.०७१२-२०२२१९८
ठिकाण : - लातूर
दिनांक :-०८.०७.२०१९

अध्यक्ष
ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर

सदस्य
ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर

कार्यकारी अभियंता/सचिव
ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर